# घरकुल आनंदयात्रा

त्रैमासिक पत्रिका

अंक 4 था (जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च 2024)



आनंद नगर, त्रिंबक रोड, पिंपळगाव बहुला, नाशिक - ४२२२१३। संपर्क : ९८६०५५२३२४

Email : gharkulparivar@gmail.com l Web : www.gharkulparivar.org


## संपादकीय !

**सप्रेम नमस्कार**

आता आपणा सर्व हितचिंतकांना पालकांना हळूहळू “घरकुल आनंदयात्राच्या” माध्यमातून घरकुल मध्ये घडणाऱ्या कार्यक्रम, भेटीगाठी याविषयी माहिती मिळू लागली आहे. “आनंदयात्राचा” या वर्षातील हा चौथा अंक! या निमित्ताने या e-bulletin चे एक आवर्तन पूर्ण झाले. हा अंक नियमित काढण्यात अनेक हातांचे सहकार्य लाभते. विशेषतः घरकुलच्या लेडीज विंग मधील मैत्रीण वल्लरी प्रधान आणि तिच्या Acme या फर्ममधील टीम या अंकाचे डिझाईनिंग करते. त्यामुळे हा अंक आकर्षक स्वरूपात आपल्यापर्यंत पोहोचवता येतो.

एक आग्रहाची विनंती आहे. “घरकुल आनंदयात्राचा” हा प्रवास अधिकाधिक समृद्ध आणि वाचनीय होण्याच्या दृष्टीने तुमच्या नवनवीन कल्पना आणि सूचना तसेच अंक आवडल्याचे निरोप आमच्यापर्यंत भरभरून येऊ देत, म्हणजे संवाद दुतर्फी होईल, उणीवा दूर होतील.

सर्वांना घरकुल परिवारातर्फे सस्नेह शुभेच्छा!

**-: संपादकीय मंडळ :-**

| | |
|---|---|
| सौ . सुनिता आडके | सौ . साधना देशमुख |
| सौ . विद्या फडके | सौ . वल्लरी प्रधान |
| श्री . नरेश महाजन | सौ . सोनल खाडिलकर |





**गुढी पाडव्या निमित्त घरकुल मध्ये तयार केलेल्या आकर्षक गुढ्या**

# गोठींचा जिव्हाळा.....

प्रारंभीच्या काळात घरकुला घराची काळजी होती. आऊमाऊ आणि नंतर पाथर्डी फाट्यावर अशा दोन्ही वास्तू चांगल्या होत्या. मात्र विशेष मुलींच्या शारीरिक, मानसिक, भावनिक गरजा लक्षात घेऊन आणि त्याचबरोबर मुलींची व त्यांना संभाळणाऱ्या मावशींच्या गरजा लक्षात घेऊन अधिक मोठी, सर्व सोयींनी युक्त जागा हवी होती.

त्यामुळे आमची सर्व टीम जागेच्या शोधात फिरत होती. सरकारी जागा मिळाली तर खूपच बरे असेही प्रारंभी वाटत होते .कारण ती विनामूल्य किंवा अल्प दरात मिळाली असती. त्याप्रमाणे तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी आम्हाला काही जागाही दाखवल्या होत्या .परंतु त्या जागाही फार मनासारख्या नव्हत्या आणि त्यात इतरही अनेक अडचणी येत होत्या.

त्याच वेळेला ही सर्व आमची वणवण, धडपड आमचे स्नेही राजेंद्र गोठी हे बघत होते. त्यांची मुलगी पिंकी ही घरकुलमध्ये येत होती. तिला तिथे खूप छान विरंगुळा मिळत होता. पिंकीसारख्या अनेक मुलींना राजेंद्रजी अगदी जवळून बघत होते. त्यामुळे राजेंद्रजींना घरकुलबद्दल एक वेगळीच माया, जिव्हाळा वाटू लागला होता. तेही एकीकडे अस्वस्थ होते. इतके चांगल्या काम करणाऱ्या संस्थेला चांगली जागा मिळायला हवी ही तळमळ त्यांनाही लागली होतीच.फक्त विचार करणारे खूप असतात. पण नुसती मनातल्या मनात तळमळ , खंत व्यक्त करून थांबण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती काय करता येईल हा महत्त्वाचा विचार त्यांनी करून दाखवला .पिंपळगाव बहुलाला त्यांची एक जागा होती आणि त्या बऱ्यापैकी मोठ्या जागेत आपल्याला घरकुलसाठी या मुलींच्या सर्व अडीअडचणी सोयी लक्षात घेऊन एक छान इमारत बांधता येईल हा विचार त्यांच्या डोक्यात आला आणि त्यांनी तो घरकुलच्या सर्व पदाधिकाऱ्यांना बोलून दाखवला. सगळ्यांनी आनंदाने मान्यता दिली. घरकुलची हक्काची वास्तू होत आहे, ती पुन्हा पुन्हा सोडावी लागणार नाही हा त्या मागचा एक चांगला विचार होता. कारण राजेंद्रजी म्हणाले "मी तुम्हाला जा म्हणणार नाही .तुम्ही हवे तितके दिवस या ठिकाणी घरकुलचे वास्तव्य ठेवू शकता".अंतिम मसुदा तयार झाला. मुलींच्या अडीअडचणी एकूण त्यांच्या हालचालींच्या मर्यादा हे सर्व लक्षात घेऊन इमारत बांधणे आवश्यक होते. त्याप्रमाणे त्यांनी सुयोग्य असा आराखडा केला आणि अवघ्या दीड दोन वर्षात घरकुलची वास्तू पिंपळगाव बहुला या ठिकाणी उभी राहिली. प्रारंभी जरी ही वास्तू, शहरापासून दूरवर वाटत होती परंतु आता मात्र ही रुखरुख कायमची दूर झाली आहे. कारण या वास्तूची आम्हाला सवय झाली आहे. आपुलकी निर्माण झाली आहे. अतिशय शांत स्वभावाचे मनमिळावू स्वभावाचे व निरपेक्ष सहकार्य भावना असलेले राजेंद्रजी गोठी यांनी अतिशय सुंदर खोल्या उत्तम स्वयंपाक घर ,भोजनगृह सामानासाठी योग्य जागा स्वच्छतागृह अशा अनेक सोयी सुविधा या वास्तू मध्येघरकुलला दिल्या. गेली अनेक वर्ष ज्या अडचणी येत होत्या त्या दूर झाल्या आणि मुलींचे वास्तव्य मनमोकळेपणाने या वास्तुत होऊ लागले. अतिशय मोकळी हवा, आजूबाजूला मोकळा परिसर ,मुलींना सहज फिरायला जाता येईल अशी जागा यामुळे या वास्तूत मुलींचं दैनंदिन जगणं आनंदून गेलं....असा झाला पिंपळगाव बहुलापर्यंतचा प्रवास.





# घरकुलचे आधारस्तंभ



श्री देवेंद्र बापट
रिलायबल ऑटोटेक चे प्रमुख.

घरकुलच्या सुरुवातीपासूनच्या प्रवासात सोबत असलेल्या हितचिंतक देणगीदार व आधारस्तंभांमध्ये रिलायबल ऑटो टेक कंपनीचे श्री देवेंद्र बापट यांचे नाव अग्रक्रमाने येते. श्री देवेंद्र बापट आणि विद्याताईंचा परिचय वीस पंचवीस वर्षापासूनचा. तेंव्हा पासूनच श्री बापट सामाजिक कार्यात मदत करण्यासाठी अगदी तत्परतेने पुढे असायचे. विद्याताईंची ची प्रबोधिनी संस्थेतील कारकीर्द त्यांनी जवळून बघितली होती. विद्याताई ताई या मुलींसाठी करत असलेली धडपड ते बघत होते. ताईंवर त्यांचा गाढ विश्वास होता. घरकुल सुरू होऊन एक दोन वर्षे झाली असतील हळूहळू घरकुलची घडी नुकतीच बसू लागलेली होती.

एकीकडे पालकांना मुलींसाठी सुरू झालेल्या या निवासी संस्थेविषयी माहिती होत होती, मुली वाढत होत्या तसा खर्चाचा भार ही वाढत होता. त्यावेळी श्री बापट यांचा मदतीचा हात पुढे आला. तेव्हापासून ते आजतागायत. रिलायबल कंपनीकडून घरकुल ला महिन्याचा किराणा न चुकता पोहोचता केला जातो. तेही अगदी पर्सनल टच सह त्यांच्या कंपनीतील श्री अभिजीत कट्टी सर आणि त्यांचे सहकारी हे दर महिन्याला जातीने स्वतः येतात किराणा पोहोचवतात मुलींची आस्थेने विचारपूस करतात स्वतः श्री बापट, घरकुल ला कोणत्याही प्रकारे मदत करण्यासाठी अगदी तत्पर असतात. हे सगळं करताना त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे प्रसिद्धी विन्मुखता. श्री बापट यांचे कुटुंबीय, त्यांच्या भगिनी ह्या देखील वेळोवेळी मोलाची मदत करतात. त्यांची जनरेशन नेक्स्ट म्हणजे त्यांची कन्या. सौ. स्नेहा आधारकर हि देखील हा वारसा पुढे नेत आहे. घरकुल शी तीचे आणि रिलायबल च्या एच आर टीमचे जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले आहे. मागील वर्षी रिलायबलच्या महिला स्टाफ च्या वतीने उपयुक्त असा ट्रेनिंग प्रोग्राम घरकुलच्या स्टाफ साठी घेतला होता. या ट्रेनिंगचा विषय होता "संस्थेची मूल्य कशी ठरवावी?" याच प्रोग्राम मध्ये स्टाफ आणि विद्यार्थिनींसाठी काही छोटे छोटे गेम्स सुद्धा त्यांच्या टीमने आयोजित केले होते अशा प्रकारे रिलायबल ऑटो टेक आणि घरकुल यांचा ऋणानुबंध जुळलेला आहे.

यावर्षी जानेवारी 26, 27. आणि 28 .2024 रोजी घरकुल मध्ये महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी “अंतर्नाद” या निवासी शिबिराचे आयोजन केले होते या शिबिरासाठी श्री बापट यांनी स्पॉन्सरशिप दिली. अशा प्रकारे घरकुलच्या कोणत्याही नवीन कामात श्री. देवेंद्र बापट, त्यांचे कुटुंबीय आणि त्यांची कंपनी ही खंबीरपणे पाठीशी उभी राहते. त्यांनी त्यांच्या संपर्कात आलेल्या अनेकांना घरकुल विषयी माहिती सांगितली आहे व त्यांची भेट घडवून आणली आहे. बापट साहेबांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अतिशय ऋजू स्वभाव. आपण कुणी मोठे देणगीदार आहोत असा कोणताही आव ते कधीच आणत नाहीत. असे श्री बापट साहेब घरकुल चे भक्कम आधार स्तंभ आहेत. घरकुल श्री देवेंद्र बापट, त्यांचे कुटुंबीय तसेच रिलायबल ऑटोटेक मधील संपूर्ण स्टाफ यांच्या प्रति मनापासून कृतज्ञ आहे.

घरकुल च्या आजवरच्या प्रवासातील सगळ्यात मोठे संचित म्हणजे श्री देवेंद्र बापट यांच्या सारखी प्रेमाची माणसे.



सौ जयश्रीताई नेरकर



सौ लताताई मांगटे

घरकुल मध्ये पाहुणे आल्यानंतर त्यांचे आदरातिथ्य चहा आणि खारी पुरी ने केले जाते. चहाचा पहिला घोट आणि खारी पुरीचा तुकडा तोंडात टाकताना पाहुण्याने "आहा!" म्हटले नाही असे घडतच नाही. याचे कारण घरकुलची अन्नपूर्णा जोडगोळी जयश्रीताई आणि लताताई.

2013 मध्ये घरकुल पिंपळगाव बहुला येथे स्थलांतरित झाले तेव्हा सगळ्यात मोठा प्रश्न होता तो मुलींसाठी जेवण चहा नाश्ता इत्यादी कोण बनवणार? पण ह्याच उत्तर फडके मॅडम ना लगेचच मिळाले. गावातल्या जयश्रीताई घरकुल मध्ये आल्या आणि विद्याताईंना म्हणाल्या, 'मला इथे काही काम मिळेल का?'

तेव्हा मॅडमनी त्यांना विचारले तुला काय काम येते? जयश्रीताई म्हणाल्या मला स्वयंपाक करता येतो. त्यांच्या या उत्तराने मॅडम ना अगदी बर वाटल. अश्या प्रकारे ही अन्नपूर्णा स्वतः चालत घरकुलात आली. आज मुलींच्या दिवसभराचा चहा नाश्ता जेवण हे तर त्या चवदार करतातच,पण घरकुल मध्ये येणारे पाहुणे , नातेवाईकांच्या स्मरणार्थ दिल्या जाणारे जेवण, असो कि आणखी काही असा जवळजवळ शंभर माणसांचा स्वयंपाक जयश्रीताई तेवढ्याच आवडीने आणि चवीने बनवतात. रोजच्या जेवणाच्या कामाबरोबरच घरकुल मध्ये बनवले जाणारे फूड प्रॉडक्ट्स त्याची चव दर्जा टिकवून ठेवण्यासाठी जयश्री ताईंची मोठीच मदत होते. खारीपुरी, पातळ पोह्यांचा चिवडा, शंकरपाळी, नागली पापड ,कुरडया ,साबुदाणा बटाटा पापड अशा अनेक पदार्थांची चव एकसारखी राहण्याचे श्रेय जयश्रीताईचे मुलींसाठी सकस ताज चविष्ट जेवण रोज बनवून देणे ही एक प्रकारे सेवा असे त्या मानतात. मुलींची प्रकृती चांगली राहण्यासाठी त्यांच्या या चवदार जेवणाचा हातभार आहे. जयश्री ताईंना घरकुल ने त्यांच्या जीवनातील कठीण प्रसंगी (यजमानांच्या मृत्यू पश्चात) आधार दिला आहे येथील कामाच्या मुळे त्यांना एक दिशा मिळाली त्यांच्या मुलाला त्यांनी इंजीनियरिंग पर्यंतचे शिक्षण दिले आणि आता तो चांगल्या नोकरीमध्ये स्थिरावला आहे. अशा प्रकारे जयश्रीताई नेरकर या घरकुल कुटुंबाचा एक भाग आहेत. आपल्या परिस्थितीला हातभार लावण्यासाठी घरकुल ने दिलेल्या आधाराची त्यांना जाणीव आहे आणि ह्या कामांमध्ये आपण कायम बाईंबरोबर म्हणजे विद्या ताई बरोबर आहे अशी भावना त्या बोलून दाखवतात.

दुसरी शिलेदार म्हणजे लताताई मांगटे.

लताताई सुद्धा किचनमध्ये जयश्री ताईंना मदत करतात रोजच्या पोळ्या आणि किचन मधली इतर काम लताताई करतात. त्यांच्याही कठीण काळात त्यांना घरकुल ने आणि बाईंनी खूप आधार दिला असे त्या आवर्जून सांगतात.

फराळाच्या पदार्थांची ऑर्डर असेल तेव्हा त्याही कामात त्यांचा मोठा सहभाग असतो स्वयंपाकाच्या कामात आवड असणाऱ्या विद्यार्थिनींना या दोघी मिळून योग्य पद्धतीने प्रशिक्षित करतात जयश्रीताई आणि लताताई या घरकुलच्या अन्नपूर्णा आहेत.

गमतीने असं म्हटलं जातं की आमच्या जयश्री ताईंनी पाण्याला जरी फोडणी दिली तरी त्याला चव येते. यात अतिशयोक्ती अजिबात नाही. अशा या जोडगोळीने घरकुलचेआरोग्य आणि समाधान निश्चिंत केलं आहे .यांच्या सारख्या अनेक सहकाऱ्यांच्या सहभागाने घरकुल आश्वस्त आणि समाधानाने वाटचाल करत आहे.

## एकेकीची गोष्ट :- युगांधरा जोशी

युगंधरा ही घरकुलची अगदी पहिल्या दिवसापासून ची विद्यार्थिनी तिचे वडिल श्री. माधव जोशी व आई सौ. मेघना जोशी यांचा घरकुल च्या सुरुवातीच्या वाटचालीत मोलाचा वाटा होता. तिचे वडील श्री. माधव जोशी हे घरकुलच्या अकाउंट्स चे काम बघायचे तर तिची आई घरकुल मधील मुलींना सांभाळणे त्यांची काळजी घेणे या कामात सहभागी होत असे. युगंधराचे मानसिक दिव्यांगत्व हे सेरेब्रल पाल्सी या प्रकारातले. काही प्रमाणात शारीरिक हालचालींवर मर्यादा असूनही ती सगळ्या उपक्रमात उत्साहाने सहभागी होते. तिला गाणी म्हणायला आणि ऐकायला खूप आवडते. युगंधराला अनेक श्लोक प्रार्थना आरत्या तोंडपाठ आहेत.

बॉल पेन assembling चे काम ती उत्साहाने करते. पालक दर महिन्याला भेटायला येतात तेव्हा ती कौतुकाने घरकुल मध्ये झालेले कार्यक्रम, कोणी कोणी घरकुल ला भेटी दिल्या त्या पाहुण्यांविषयी, साजरा झालेल्या वाढदिवस विषयीअगदी कौतुकाने सांगत असते. युगंधराला विशेष आवडणारे गाणे म्हणजे 'ही चाल तुरुतुरु' हे गाणं लावलं की ती गाणं म्हणायला लागते आणि हाताने ठेका देते.

अशी ही युगंधरा घरकुल मधील एक हसतमुख विद्यार्थिनी

# कार्यक्रम आणि भेटीगाठी

## जानेवारी 2024

- एस एम आर के महिला महाविद्यालयाच्या ह्युमन डेव्हलपमेंटच्या पाच विद्यार्थिनींची एक महिन्याची इंटर्नशिप 6 डिसेंबर 23 ते सहा जानेवारी 24 अशी पूर्ण झाली. या काळात त्यांनी विद्यार्थिनींना विविध कौशल्य शिकविले. तसेच त्यांचे Games व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले.
- सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली राधिका फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ चेतना सेवक व त्यांच्या सहकाऱ्यांनी घरकुल ला भेट दिली व विद्यार्थिनींसाठी गिफ्ट दिलेत.
- दिनांक 26 जानेवारी प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. डॉक्टर शिरीष सुळे व डॉक्टर विजयाताई सुळे हे प्रमुख पाहुणे होते त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजवंदन ,राष्ट्रगीत ,झेंडा गीत व नंतर मुलींचा योगा डान्स इत्यादी सादर करण्यात आले.

## <u>अंतर्नाद निवासी शिबीर</u>

- दिनांक 26 ते 28 जानेवारी 2024 असे तीन दिवसांचे “अंतर्नाद” हे निवासी शिबिर युवा वर्गात समाज भान निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आले या शिबिरासाठी समाजशास्त्र महाविद्यालय व एस एम आर के महिला महाविद्यालयाच्या एकूण 40 विद्यार्थिनींचा सक्रिय सहभाग होता. या तीन दिवसात विविध तज्ञ मान्यवर वक्त्यांनी समाजभान या प्रमुख विषयाला धरून विविध पैलूंवर मांडणी केली. शिबिराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थिनी आणि विषय तज्ञ यांचा मनमोकळा संवाद.
- शिबिराचे उद्घाटन डॉ. भरत केळकर व डॉ. मृणालिनी केळकर यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यांनी दोघांनी त्यांचे अनुभव कथन करून समाजभान निर्माण होण्याची प्रक्रियाच एक प्रकारे उलगडून दाखविली. डॉ. भरत केळकर यांनी त्यांचे युद्धभूमीवरील सैनिकांची वैद्यकीय शुश्रूषा करतानाचे अनुभव सांगितले ,यातून या शिबिरार्थींना एका वेगळ्या विश्वाची ओळख झाली तर डॉ. मृणालिनीताईंनी नाशिक मधील निवृत्तीनाथांच्या वारीच्या निमित्ताने आलेले विशेषतः महिला वारकऱ्यांचे अनुभव त्यांच्या समस्या आणि त्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी शासकीय यंत्रणे सोबतचे अनुभव असा पट उलगडून दाखवला.
- डॉ. संजय सावळे सरांनी समाजशास्त्रीय सिद्धांतांच्या आधारे सामाजिक समस्यांचे बदलते स्वरूप व युवकांमध्ये समाजभान निर्माण होण्याची गरज याविषयीचे अभ्यासपूर्ण विवेचन केले.
- डॉ. ऋचा सुळे यांनी अपंगत्व स्वरूप, कारणे व उपाय योजना याविषयी रोल प्ले च्या माध्यमातून मांडणी केली व अपंगत्व विशेषतः मानसिक अपंगत्व या संदर्भातील वैद्यकीय व सामाजिक दृष्टिकोन मांडला
- घरकुलच्या संस्थापिका आदरणीय विद्याताई फडके यांनी मुलींसमोर घरकुलच्या आजवरच्या प्रवासाच्या आठवणी विषद केल्या ते ऐकताना मुलींचे डोळे पाणवले.
- नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अशीमा मित्तल यांनी पण भेट देऊन विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या
- अंतर्नादचा पहिला दिवस असा दणदणीत गेला आणि संध्याकाळी समाजशास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'माणसा दुष्मनाला जाण रे 'हे पथनाट्य सादर केले त्यात सद्य परिस्थितीवर आरक्षण, स्त्री शोषण, हुंडा, जातीयता हे प्रश्न म्हणजेच आपले शत्रू आहेत असा आशय प्रतीत होत होता.
- संध्याकाळी शुभंकरोती प्रार्थना झाल्यावर शिबिरार्थी विद्यार्थिनी व घरकुलच्या विद्यार्थिनी यांच्यात अनौपचारिक संवाद घडून आला, ओळख झाली.

# कार्यक्रम आणि भेटीगाठी

## जानेवारी 2024

- अंतर्नादचा दुसरा दिवस 27 जानेवारी ला सकाळी श्रीमती प्रज्ञा पाटील प्रसिद्ध योगशिक्षिका व सलग 103 तास योगासने करण्याचा गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये विक्रम नोंदविलेल्या म्हणून माननीय प्रंतप्रधान मोदीजींच्या हस्ते त्यांचा सन्मान झाला अशा या प्रज्ञाताई. त्यांनी मुलींसमोर हा विश्वविक्रम कसा केला याविषयी रोमहर्षक प्रेरणादायी अनुभव कथन केले व नंतर काही योगकृती मुलींना शिकविल्या. अगदी सकाळी झालेल्या या सत्रामुळे मुली अगदी ताज्या तवान्या व उत्साहीत झाल्यात.
- या दिवशीचे पहिले सत्र होते श्रीमती ऋता पंडित यांचे त्यांनी समाज भान आणि सक्षमीकरण या अनुषंगाने मांडणी केली त्यांनी या संदर्भातील त्यांचे काही अनुभव शेअर केले हे सत्र विद्यार्थिनींना बोलत करण्यासाठी ही यशस्वी झाले मुलींनी अनेक प्रश्न शंका विचारल्या त्यांच्या शंकांचे योग्य समाधान ऋता पंडित यांनी केले.
- 'वेगळ्या वाटेवरचे प्रवासी 'या शीर्षकांतर्गत अंजली प्रधान या शारीरिक अपंगत्व असलेल्या व सलग अकरा वेळा कळसुबाई शिखर सर केलेल्या तरुणींचा प्रवास शिबिरार्थींनी जाणून घेतला.
- दुपारच्या सत्रात श्रीमती स्मिता वानखेडे यांचे पॉझिटिव्ह अफेर्मेशन या विषयावरचे भाष्य विद्यार्थिनींना आपला ध्येय प्रवास निश्चित करणे व त्यासाठी प्रयत्न करणे यासाठी प्रेरणादायी ठरला.
- तर संध्याकाळचे सत्र या महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी अगदी भारावलेले होते या सत्रासाठी ज्या मायलेकरांची जोडी होती ती म्हणजे पुस्तकांचे हॉटेलच्या संचालिका भीमाबाई जोंधळे आणि त्यांचे चिरंजीव श्री प्रवीण दादा जोंधळे यांच्यासोबत ची बातचीत आत्म भान समाज भान येण्यासाठी वाचनाचे महत्त्व किती आहे याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे पुस्तकांची आई भीमाबाई जोंधळे!
- या दिवशी संध्याकाळी शिबिरार्थी विद्यार्थिनींनी अतिशय उत्तम असे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले घरकुलच्या मुलींनीही यात भाग घेतला व सर्वांनी आनंद लुटला
- शिबिराचा तिसरा व शेवटचा दिवस म्हणजे 28 जानेवारी सकाळची सुरुवात प्रार्थना व सुलभ व्यायाम घरकुलच्या मुलींबरोबर शिबिरार्थींनी केले. धनश्री घटे या झुंबा ट्रेनर यांनी झुंबा व्यायाम व डान्स याविषयी प्रात्यक्षिक दिले व सर्वांना करायला शिकविले.
- पहिले सत्र प्रसिद्ध कार्पोरेट ट्रेनर उद्योग जगतातील mentor माननीय श्री विनोद भाई पारेख यांनी घेतले. त्यांनी अचूक निर्णय प्रक्रिया विकसित करण्याची दिशा याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले कृतिशील सत्र असल्यामुळे विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता.
- भोजनपूर्व सत्रात एक महत्त्वपूर्ण विषय हाताळला, मुक्ता चैतन्य यांचे नाव सायबर पत्रकारितेत सर्वश्रुत आहे. त्यांनी 'समाजभान व डिजिटल माध्यमांविषयी सावधगिरी' या विषयावर मांडणी केली हे सत्र जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे खूपच संवादी ठरले.
- समारोप सत्र साठी "देणे समाजाचे" या संकल्पनेच्या व उपक्रमाच्या प्रवर्तक वीणाताई गोखले (पुणे) यांना निमंत्रित केले होते.त्यांचा हा उपक्रम समाजभाना चा कृतिशील टप्पा होय. अशी संकल्पना त्यांना कशी सुचली, ती कार्यान्वित कशी झाली ,अडचणी काय आल्यात आणि ह्या उपक्रमाचे यश काय असा सर्व स्पर्शी थांडोळा त्यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून घेतला गेल्या. विद्यार्थिनींना मीनाताईंचा "देणे समाजाचे" हा उपक्रम नव्याने समजला. याच सत्रात श्री. भा. ल. कोरेगावकर हे उमेद या अपंगांसाठीच्या पालक सपोर्ट ग्रुपचे संस्थापक यांना निमंत्रित केले होते. त्यांनी एका मानसिक दिव्यांग मुलाचे पालक या नात्याने 'अपंगांचे पालकत्व 'या विषयावर अनुभव कथन केले. समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख सर समारोप सत्र स उपस्थित होते, त्यांच्या हस्ते विद्यार्थिनींना प्रमाणपत्रे देण्यात आली.

## जानेवारी 2024

अशा प्रकारे या तीन दिवसांच्या निवासी शिबिराची यशस्वी सांगता झाली. या शिबिराला रिलायबल ऑटोटेक चे श्री देवेंद्र बापट यांनी स्पॉन्सरशिप दिली होती , त्यामुळे घरकुलवर कोणताही अतिरिक्त ताण न येता हे शिबिर व्यवस्थित पार पडले.

### अंतर्नाद निवासी शिबिराची क्षण चित्रे



डॉ. केळकर यांचे मार्गदर्शन



डॉ. संजय सावळे यांचे मार्गदर्शन



भीमाबाई जोंधळे आणि श्री प्रवीण जोंधळे यांची मुलाखत



जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकारी माननीय आशिमा मित्तल यांनी शिबिरार्थींना शुभेच्छा दिल्या.

# कार्यक्रम आणि भेटीगाठी

**अंतर्नाद निवासी शिबिराची क्षण चित्रे**



डॉ ऋचा सुळे यांचे दिव्यांगत्व स्वरूप, कारणे व उपाय या विषयांवर मार्गदर्शन



मुक्ता चैतन्य यांचे 'समाजभान व डिजिटल माध्यमांविषयी सावधगिरी' या विषयावर मार्गदर्शन



मा. श्री विनोद भाई पारेख शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना



श्रीमती विणा ताई गोखले अंतर्नाद शिबिराच्या समारोप प्रसंगी मार्ग दर्शन करतांना

## फेब्रुवारी 2024

- गुंज फाउंडेशनने आयोजित केलेल्या फन फेअर मध्ये घरकुलच्या विद्यार्थिनींना निमंत्रित केले होते .येथे डान्स, पपेट शो, फनी गेम्स व भोजनाचा आनंद मुलींनी घेतला.
- ब्राझीलमध्ये आयोजित मूकबधिर खेळाडूंच्या ऑलम्पिक स्पर्धेत भारतातर्फे एअर रायफल शूटिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळवलेली प्रियेषा देशमुख हिने तिच्या वडिलांसोबत घरकुल ला भेट दिली. रायफल नेमबाजीचे प्रात्यक्षिक विद्यार्थिनींना दाखवले.
- जिल्हा परिषद नाशिक च्या वतीने आयोजित गोदावरी महोत्सवात घरकुल चा स्टॉल लावला 5 ते 7 फेब्रुवारी

## आनंद यात्रेतील क्षणचित्रे



रायफरशुटर प्रीयेषा देशमुख व तिचे वडील शरद देशमुख यांनी घरकुलला भेट दिली.



गुंज फौंडेशन आयोजित फन फेअर कार्यक्रमाला मुलींची उपस्थिती .

## मार्च - 2024

### आंतरराष्ट्रीय महिला दिन

- घरकुलशी निगडित अनेक संस्थांनी विद्यार्थिनी समवेत महिला दिन साजरा केला

1) बँक ऑफ इंडियाच्या झोनल मॅनेजर श्रीमती जयश्री देशमुख यांनी घरकुल ला त्यांच्या टीम सह भेट दिली विद्यार्थिनींनी जय शारदे हे सरस्वती स्तवन, “स्त्री” या विषयावरील कविता तसेच घरकुलच्या प्रमुख सात मूल्यांवर एक छोटी नाटिका सादर केली

2) एबीबी कंपनीच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी यामध्ये श्री अजय गोसावी श्री कुलकर्णी श्री अमित सैनी सर तसेच सोनाली भामरे गायत्री मॅडम आणि अन्य महिला सहकाऱ्यांनी घरकुल मध्ये येऊन महिला दिन साजरा केला विद्यार्थिनींनी गाणी नाटिका महिलाविषयक कविता सादर केल्यात करुणाताईने महिला दिनाची माहिती दिली. एबीबी च्या टीमने विद्यार्थिनी व स्टाफला गिफ्ट दिल्यात

3) भावसार क्षत्रिय समाज महिला मंडळ नाशिक रोड यांच्यातर्फे महिला दिनाच्या निमित्ताने घरकुल मध्ये भजनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. विद्यार्थिनींनी देखील गाणी सादर केलीत

4) महिला दिनानिमित्त घरकुलच्या सर्व स्टाफ साठी स्त्री लेखिकांची पुस्तके वाचनाचा उपक्रम घेण्यात आला. वेगवेगळ्या 25 ते 30 स्त्री लेखिकांच्या विविध विषयांवरील पुस्तकांतील निवडक उतारे सादर केले. अश्या प्रकारे आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला.

* साईनंद हास्य क्लब यांच्या सदस्यांनी घरकुल ला भेट दिली व हास्य योगाचे काही नवे प्रकार शिकवले तसेच हास्य योगा वरील गाणे सादर केले व डान्स देखील सादर केला.

* एस डब्ल्यू एस फायनान्शिअल सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड मधील नवनियुक्त सदस्यांच्या टीमने घरकुल ला भेट दिली व घरकुलचे काम समजून घेतले

* होळी पौर्णिमेनिमित्त होलिका पूजन करण्यात आले तसेच पौर्णिमा असल्याने श्रीमती स्वाती पंडित यांनी मुलींचे मेडिटेशन घेतले.

* या सर्व कार्यक्रम उपक्रमा व्यतिरिक्त अनेकांनी आपल्या कुटुंबातील व्यक्तींचे वाढदिवस घरकुल मध्ये येऊन साजरे केले त्यानिमित्ताने या कुटुंबांना घरकुलच्या कामाची माहिती झाली

* BNI सदस्य श्री सुजित सिंग तसेच श्री बाफना यांच्या कुटुंबीयांनी घरकुल भेट दिली आणि घरकुल चे कार्य जाणून घेतले व आर्थिक सहकार्य केले, तसेच घरकुलसाठी भेट वस्तू दिली .

* BNI च्या अनेक सदस्यांनी घरकुल ला भेट देऊन मोठ्या प्रमाणावर गुढी पाडव्या साठी गुढ्याच्या मोठ्या ऑर्डर्स दिल्यात.



जागतिक महिला दिनानिमित्त ABB company च्या सर्व पदाधिकार्यांनी घरकुलला भेट देऊन मुलींना भेटवस्तू देऊन जागतिक महिला दिन साजरा केला.




बँक ऑफ इंडिया च्या झोनल मॅनेजर श्रीमती जयश्री देशमुख व सहकार्यांनी घरकुल ला भेट दिली जागतिक महिला दिन साजरा केला.




महिला दिनाच्या निमित्ताने घरकुल च्या विद्यार्थिनींनी Core values वर नाटिका सादर केली



SWS FINANCIAL SOLUTIONS PVT.LTD चे श्री.अधिकारी सरांच्या टीमने घरकुलला भेट दिली.

## कृतज्ञतेचा नमस्कार...

एखाद स्वप्न पुर्ण करण्याचा जेव्हा आपण मनापासून ध्यास घेतो तेव्हा ते स्वप्न पुर्ण करण्यासाठी सगळ विश्व तुम्हाला साहाय्यभूत होत. अस म्हणतात ते खोट नाही. घरकुल सुरु झाल्यापासुन ते आतापर्यंत अनेक कंपन्या व्यक्ति संस्था यांच्याकडून वेगवेगळ्या स्वरूपात योगदान व सहकार्य मिळाले. त्यामुळे १७ - १८ वर्षाचा हा प्रवास सोपा झाला. समाजाच्या सर्व स्तरातून मिळालेल्या सहयोगामुळे, प्रेमामुळे आमच्या मुलींना आम्हाला आनंददायी व दर्जेदार वातावरण देता आलेय यामुळे घरकुल रुढार्थाने एक संस्था न राहाता एक मोठ संयुक्त कुटुंब बनलं आणि आश्वासक वाटचाल करित आहे.

त्यासाठी भविष्यातही आपणा सर्वांची साथ सहकार्य जिव्हाळा हवा आहे. आपल्या प्रत्येकाच्या प्रति आमच्या मनातल्या भावना शब्दात मांडणे कठीण आहे. मात्र आपल्या प्रत्येकाच्या प्रेमाची नोंद आम्ही मनोमनी जपत राहू. सर्व ज्ञात, अज्ञात मान्यवरांना, हितचिंतकांना, देणगीदारांना धन्यवाद व कृतज्ञतेचा नमस्कार! घरकुल आपल्या सर्वांप्रती ऋणी आहे. तसेच आपणा सर्व मान्यवरांचे स्नेहीजनांचे घरकुलात कायम स्वागत आहे.

### * आवाहन *

-: ऑनलाईन देणगीसाठी :-

देणगीस ८०जी अन्वये आयकरात सुट

| | |
|---|---|
| A/C Name: | Gharkul Parivar Sanstha |
| Bank Name: | Bank of India |
| Branch: | Shivaji Udyan, Nashik |
| A/C No.: | 080610110000256 |
| IFSC : | BKID0000806 |